**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या ५ वर्षांत व्यापार दुप्पट करण्याचं भारत आणि बेल्जियमचं लक्ष्य

- महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांचं आश्वासन

- एफडीएचे अधिकारी राज्यातल्या महाप्रसाद, भंडारा, इफ्तारी आणि लंगरची तपासणी करणार

आणि

- किदंबी श्रीकांत तसंच सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

भारत आणि बेल्जियमने पुढल्या पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट डी वेव्हर यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन जारी केलं. याविषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले

***होल्ड - प्रधानमंत्री***

भारत-युरोपीय संघ मुक्त व्यापार करारावरच्या वाटाघाटी यशस्वीपणे पूर्ण झाल्याबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केलं, आणि त्याची वेळेवर अंमलबजावणी करण्याचं आवाहन केलं. तसंच भारत-युरोपीय संघ गुंतवणूक सुरक्षा करार आणि भौगोलिक संकेत कराराबाबतच्या वाटाघाटीही लवकर पूर्ण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाचं समर्थन होऊ शकत नाही, आणि दहशतवादाचा सामना करण्यासाठीच्या सर्वसमावेशक आणि जागतिक दृष्टिकोनाप्रति आपण वचनबद्ध आहोत, असा पुनरुच्चार दोन्ही नेत्यांनी केला.

परस्पर विश्वास, लोकशाही, कायद्याचं राज्य आणि शांतता, समृद्धी आणि विकासाप्रति सामायिक दृष्टीकोन स्वीकारून भारत-बेल्जियम भागीदारी अधिक दृढ करण्याची वचनबद्धता दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांसोबत चर्चा केल्यानंतर ते बोलत होते.

***होल्ड - शिवराज सिंग***

येत्या ५ वर्षांत महिला बचत गटांना १० लाख कोटींचं कर्ज देण्याचं आणि बचत गटातल्या महिलांना १ लाख कोटी रुपयाचं कर्ज देण्याचं उद्दिष्ट असल्याचं ते यावेळी म्हणाले.

देशात ६ कोटी लखपती दीदी बनवण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यातल्या साडे ३ कोटी पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित लखपती दीदींचं लक्ष्य पूर्ण करण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असंही ते म्हणाले.

<><><><><>

हिमालयातल्या संवेदनशील हिमनद्या आणि हिमस्खलन-प्रवण क्षेत्राकडे सातत्याने आणि सक्रियपणे देखरेख ठेवण्याची गरज असल्याचं केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी म्हटलं आहे. हिमनद्या वितळल्यामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीचा सामना करण्यासाठी हिमालयीन क्षेत्रातली राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली इथं आयोजित बैठकीत ते आज बोलत होते.

<><><><><>

सणासुदीच्या काळात पाळायच्या अन्न सुरक्षा उपाययोजनांसाठी कायमस्वरूपी, सर्वसमावेशक आदेश महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनानं आज जारी केला. याअंतर्गत विभागाचे अधिकारी अन्नछत्रं, महाप्रसाद, इफ्तारी, लंगर आणि भंडाऱ्यांच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करतील. सणासुदीच्या काळात खाद्यतेल, फळं, सुकामेवा, पनीर, खवा, मांस अशा खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते, आणि याच वेळी कमी दर्जाच्या किंवा भेसळयुक्त पदार्थांचा धोकाही वाढतो, तो टाळण्यासाठी हे आदेश दिल्याचं अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. यादृष्टीनं, उपवासाचे पदार्थ, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मांस, पाणी आणि बर्फ, खाद्यतेल, फळं, सुकामेवा, अन्नपदार्थ वाटप, बेकऱ्या, ई-कॉमर्स आणि आयात केलेलं अन्न या जास्त जोखमीच्या ११ खाद्यपदार्थांसाठी तपासणीसाठी स्वतंत्र प्रक्रिया ठरवून दिली आहे. याअंतर्गत सर्व धर्मांच्या

सणांचं, राज्यव्यापी, प्रादेशिक आणि स्थानिक सण असं वर्गीकरण केलं असून अन्न सुरक्षेच्या दृष्टीनं ४ टप्प्यांची अंमलबजावणी यंत्रणा आखून दिली आहे. हे करताना कोणत्याही उपहारगृह चालकांना विनाकारण त्रास दिला जाणार नाही, असं आश्वासनही मुंढे यांनी दिलं.

**<><><><><>**

नीट-पीजी २०२६ ची फेरपरीक्षा घेण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावली आणि याचिकाकर्त्याला २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला. कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर केल्याबद्दल याचिकाकर्त्याच्या वकिलाविरोधात बार काउन्सिल ऑफ इंडियानं कारवाई करावी अशी विनंती करणार असल्याचं न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या पीठानं सांगितलं.

**<><><><><>**

मेटा संचालित समाज माध्यमांवर प्रदर्शित झालेल्या सशुल्क जाहिरातींमुळे भारतात बाललैंगिक शोषणाला प्रोत्साहन मिळत असल्याच्या आरोपांची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घेतली आहे. याप्रकरणी आयोगानं माहिती आणि प्रसारण मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि दिल्ली पोलीस आयुक्त यांच्याकडून दोन आठवड्यांच्या आत सविस्तर अहवाल मागवला आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागांना मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला असून उत्तर प्रदेशात पावसाशी संबंधित घटनांमध्ये ५ जणांचा मृत्यू झाला. उत्तर प्रदेशाच्या चित्रकूट जिल्ह्यात एक मातीचं घर कोसळून ३ जण ठार झाले. अमेठी आणि बाराबंकी इथं २ स्वतंत्र घटनांमध्ये मातीच्या भिंती कोसळून २ ज्येष्ठ नागरिकांचा मृत्यू झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसीच्या जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून तिथल्या पूरस्थितीचा आढावा घेतला. पूरबाधितांना तत्काळ मदत द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

बिहारमध्ये गंगा नदी पूरपातळीच्या जवळ पोहोचली आहे, हिमाचल प्रदेशात अनेक ठिकाणी भूस्खलन आणि रस्ते बंद झाले आहेत, तर पश्चिम बंगालमध्ये रेल्वेसेवा विस्कळीत झाली आहे.

**<><><><><>**

चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत आज पुरुष एकेरीत भारताचा किदाम्बी श्रीकांत यानं कॅनडाच्या व्हीक्टर लाय ला पराभूत करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. उपांत्यपूर्व फेरीत उद्या त्याचा सामना हाँगकाँगच्या ली चेक यिऊ याच्याशी होईल.

पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं फ्रान्सच्या जोडीवर मात करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीत तन्वी शर्मा हिला जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या जोडीचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, टी-२० आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना हाँगकाँगशी सुरू आहे. हाँगकाँगनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ३ षटकात बिनबाद १९ धावा झाल्या होत्या.

भारताय महिला संघानं गेल्या रविवारी थायलंडच्या संघावर ९४ धावांनी मात केली होती. आजचा सामना जिंकला, तर उपांत्य फेरीत भारताचं स्थान निश्चित होईल.

<><><><><>

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी आज व्हायब्रंट गुजरात रोड शोचा एक भाग म्हणून मुंबईत विविध उद्योगपतींची भेट घेतली आणि गुजरातच्या विकासाच्या प्रवासात भागीदार व्हायचं निमंत्रण त्यांना दिलं. जानेवारीत ही परिषद होणार आहे.

<><><><><>

रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी सर्व प्रकारची मदत करायला भारत नेहमीच तयार आहे, याचा पुनरुच्चार परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज केला. युक्रेनचे परराष्ट्रमंत्री अँड्री सिबिहा यांची कीव्हमध्ये भेट घेतल्यावर ते वार्ताहरांशी बोलत होते. सध्याचा काळ युद्धाचा नाही, त्यामुळं युद्धभूमीवरून कुठल्याही समस्येसाठी तोडगा मिळणार नाही, असं जयशंकर म्हणाले. त्यानंतर त्यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांचीही भेट घेतली.

//<><><><><>//